# ई - पोलीस पत्रिका

दि.०८/०९/२०२३ अनु.क्र.१६३

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशीमित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्तव तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्धकठोरकारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१
## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/१००१/२०२३ अमरावती शहर दिनांक ०१/०९/२०२३**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपना करीता विशेष रजा शासननिर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-2017/प्र.क्रं.25/सेवा-6, दिनांक 23/7/2018 मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | पदनाम/ब.नं./नांव व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | यापुर्वीउपभोगलेली रजा | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मपोशि/594,रोशनी नागोसे पोलीस मुख्या. | दि.25/04/2023 | 1 | पहिल्या | प्रसुतीला जोडुन | 60दिवस |
| 2 | मपोशि/1886,बबीता जाधव शवाशा पश्चिम | दि.01/03/2023 | 1 | पहिल्या | प्रसुतीला जोडुन | 60दिवस |
| 3 | मपोशि/335,मोनाली मोकळकर कोतवाली | दि.13/03/2023 | 1 | पहिल्या | प्रसुतीला जोडुन | 60दिवस |
| 4 | मपोशि/891,अन्नु शेंडे नागपुरी गेट | दि.30/08/2020 | **2** | दुस-या | दि.03/09/2021 पासुन 15 दिवस दि.11/05/2022 पासुन 15 दिवस | 30 दिवस |
| 5 | मपोशि/788,शारदा रोकडे वलगाव | दि.03/02/2023 | 1 | पहिल्या | प्रसुतीला जोडुन | 60दिवस |

**अटी व शर्ती** :-

1 मुलाचे वय 18 वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

2. एका वर्षामध्ये कमाल 2 महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

3. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

4. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

5. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतीम आदेश/पोना१६९० भोगे+१/९९३५/२०२३ अमरावती शहर दिनांक ३०/०८/२०२३**

## आदेश

**संदर्भ :-** या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो./पोकॉ-१६९० भोगे+१/११७४/ २०२३ अमरावती शहर, दिनांक १०/०२/२०२३

**कसुरदारचे नाव :-** १) नापोकॉ/१६९० सुरेंन्द्र भोगे, नेमणुक पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती शहर.
२) पोकॉ/५४ निलेश वरघट, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही (१) नापोकॉ/१६९० सुरेंन्द्र भोगे, पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती शहर व (२) पोकॉ/५४ निलेश वरघट, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन डायल - ११२ कर्तव्यावर दिनांक २४/०१/२०२३ रोजी तुमचे एम.डी.टी. जाणिवपुर्वक नॉन ट्रॅकींग वर ठेवल्याचे आढळुन आल्याने पोलीस उपआयुक्त (मुख्या.)यांनी तुम्हास पोलीस उपआयुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे दालनात बोलावण्यात आले होते.पोलीस उपआयुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे दालनात सपोनि श्री रितेश राऊत, सुपरवायजर डायल - ११२ यांनी तुम्हाला पेश केले होते. पोलीस उपआयुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांनी एम.डी.टी. नॉन ट्रॅकींग का असल्याबाबत तुम्हास विचारणा केली असता तुम्ही समाधानकारक उत्तर दिले नाही.तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुनतुम्ही वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले आहे.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुनतुम्ही तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या कर्तव्यावर गैरहजर गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे (१) पोकॉ/१६९० सुरेंद्र भोगे, पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा यांनी स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक न वाटल्याने तुम्हाला तसेच (२) पोकॉ/५४ निलेश वरघट, पोलीस मुख्यालय यांनी

त्यांचे स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे शिक्षेबाबत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/लेखा/घबाअ-खंडारे/१०१३५ /२०२३ अमरावती शहर दिनांक ०६/०९/२०२३**

## आदेश

**संदर्भ :-** १.शा.नि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

२.पोआअ/लेशा/घबाअं/२०१५-१६/२२४३/२०१६ दि.०३.०३.२०१६

३.शा.नि. वित्त विभाग क्र. घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये, पोना/२६५ जितेंद्र अजाबराव खंडारे सध्या नेमणुक पो.स्टे फ्रेजरपुरा यांना संदर्भ क्र.०२ चे आदेशान्वये खालीलप्रमाणे त्यांचे नावासमोर दर्शिविल्याप्रमाणे घरबांधणी अग्रीम मंजूर करण्यात आले होते. त्यांचे वेतनपटाची पडताळणी केली असता सदर अग्रीम मुद्दल रक्कमेची कपात माहे १०/२०१७ मध्ये रु.१२९६२ x०१ कपात झाली असुन उर्वरीत रक्कम रू.१३८७०३८/- कपात झालेली नाही.त्यामुळे उर्वरीत मुद्दल रकम व त्यावरील व्याज रक्कम वसुल होणे बाकी आहे.तरी मुददल रकमेची कपात नियोजित हफत्यानुसार तसेच त्यांचे सेवानिवृत्तीचे दिनांकानुसार खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| अ.क्र | पोलीस अमलदार यांचे नाव व पदनाम | मंजूर घ.बा.अ रक्कम व दिनांक | वसुल केलेली घबाअ मुद्दल | शिल्लक मुद्दल रक्कम व हफते | कपात सुरु करावयाचा महिना |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोना/२६५ जितेंद्र अजाबराव खंडारे, नेमणूक पो.स्टे फ्रेजरपूरा | रू.१४०००००/- | १२९६२/- | रू.१३८७०३८/-<br>२००००X६५<br>=१३०००००/-<br>**उर्वरित मुद्दल रक्कम रू.८७०३८/- व त्यावरील व्याज सेवानिवृत्ती उपदानातून कपात करण्यात येईल.** | सप्टेबर-२०२३ |

तरी मा.महालेखाकार यांचे आक्षेपाचे तसेच अतिरीक्त रक्कम भरण्याचे अधिन राहून वरीलप्रमाणे नमूद पोलीस अमलदार यांचे कडील शिल्लक घरबांधणी अग्रीमाचे मुद्दलाची परिगणना करण्यात आली असून त्यांचे **माहे ०९/२०२३** चे वेतनातून सदरची कपात सुरु करावी. तथापी वरील नमूद पोलीस अमलदार सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त झाल्यास मुद्दल व व्याजाची रक्कम शिल्लक राहील्यास शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र.घबाअ-२०१९/ प्र.क्र. १४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र.७ (११) अन्वये शिल्लक रक्कम त्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसुल करण्यात यावी.

**२.पोआअ/प्रलि-पशा/वि.अ.गट-ब/राजीनामा/९९८५/२०२३ अमरावती शहर दिनांक ३१/०८/२०२३**

**संदर्भ :-** श्री. सागर मानकर, विधी अधिकारी, गट -ब, नेमणुक पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांचा एक महिन्यापूर्वी पुर्व सुचना ( नोटीस ) दिनांक ०१/०८/२०२३

**विषय :-** विधी अधिकारी, गट -ब या पदाचा राजीनामा स्विकारण्या बाबत.

*****

श्री. सागर विश्वासराव मानकर, विधी अधिकारी, गट -ब, नेमणुक पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांची या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोआअ/प्रलि-पशा/वि.अ./ नेमणुक/ 2023-7090 दिनांक 20/06/2023 अन्वये कंत्राटी पध्दतीने निव्वळ 11 महिन्याकरीता दिनांक 26/06/2023 ते 25/05/2024 पर्यंत दरमहा एकत्रित मानधन रु. 25,000/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रु. 3,000/- एवढया मानधनावर तात्पुरते स्वरुपात विधी अधिकारी, गट - ब या पदावर दुसरी संधीवर नेमणुक करण्यात आली होती.

श्री. सागर विश्वासराव मानकर, विधी अधिकारी, गट -ब यांनी दिनांक 01/08/2023 अन्वये विधी अधिकारी या पदाचा राजीनामा पुर्वसुचना ( नोटीस ) दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शासन निर्णय, क्रमांक :एसपीपी 2005/ प्र.क्र.247/ पोल-10, दिनांक 15 सप्टेंबर 2006 अन्वये नियुक्तीचे वेळी संबधिताबरोबर विहीत प्रपत्र परिशिष्ट ब मध्ये करारनाम्यातील अनुक्रमांक 8 मध्ये एक महिन्यापूर्वी पूर्व सुचना ( नोटीस ) देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदर विधी अधिकारी यांची एक महिन्यापूर्वी पुर्व सुचना ( नोटीस ) या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने श्री. सागर विश्वासराव मानकर यांचा दिनांक 01/09/2023 पासुन विधी अधिकारी, गट -ब या पदाचा राजीनामा मंजुर करण्यात येत आहे.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस